# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२४

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक २८ जून, २०२४ / आषाढ ७, १९४६ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२) उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री** | |
| **(३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | |
| **(५) अल्पसंख्यांक विकास व औकाफ, पणन मंत्री** | |
| **(६) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री** | |
| **(७) अन्न व औषध प्रशासन मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३१**

---

### मुंबई विद्यापीठाच्या कलिना संकुलातील मुलींच्या वसतिगृहामधील विद्यार्थीनींना विषबाधा झाल्याबाबत

**(१) * २३६५८ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या कलिना संकुलातील वसतिगृहात राहणाऱ्या ४० हून अधिक विद्यार्थीनींना निकृष्ट जेवणामुळे व दूषित पाण्यामुळे विषबाधा झाली असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठातील सर्व मूलभूत सुविधांचा दर्जा खालावल्यामुळे मुलींसाठी असलेल्या चार वसतिगृहांपैकी एकाही वसतिगृहांत खाणावळीची सोय उपलब्ध नाही, विद्यापीठातील उपहारगृह अनेक वर्षे एकाच ठेकेदाराकडे असल्यामुळे उपहारगृहामधील खानपानाचा दर्जा घसरला आहे तसेच पालिकेकडून होणाऱ्या दूषित पाणीपुरवठ्यामुळे वा जोडण्यात आलेल्या वॉटर कुलरची स्वच्छता न केल्यामुळे विद्यार्थीनींना विषबाधा झाली आहे याची चौकशी करावी अशी मागणी करणारे निवेदन माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यापीठात आंतरराष्ट्रीय मुला-मुलींचे वसतिगृह तयार असून, आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे प्रवेश होत नसून ते वसतिगृह सर्वांसाठी खुले करण्याची मागणी होत आहे तसेच पीएचडी संशोधन गुणवत्तेसाठी विद्यावेतन गेले अनेक वर्षे बंद असून ते महागाई निर्देशांकानुसार रुपये १५००० मिळावे, अशी मागणी छात्रभारती आणि विविध विद्यार्थी संघटनांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विद्यापीठातील दूषित पाणी, घसरलेला खानपानाचा दर्जा तसेच पीएचडी संशोधन गुणवत्तेसाठी बंद करण्यात आलेले विद्यावेतन रुपये १५००० करण्याबाबत केलेल्या मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पाईपलाईनमधून येणाऱ्या दूषित पाण्यामुळे सदर प्रकार घडल्याचे निदर्शनास आल्यानंतर शुध्द पाण्याची योग्य ती उपाययोजना करुन शुध्द पाण्याचा पाणीपुरवठा करण्यात आला. मेससाठी ई-निविदा मागविण्याची प्रक्रिया विद्यापीठ स्तरावर सुरु आहे.

आंतरराष्ट्रीय वसतिगृह सुरु करण्याची आवश्यक ती कार्यवाही विद्यापीठ स्तरावर सुरु आहे. विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत बाराव्या योजनेतंर्गत विद्यापीठास निधी प्राप्त झाला होता. सदर निधीपैकी रुपये १०.०० कोटी निधी विद्यार्थ्यांच्या नॉननेट फेलोशिपकरीता मान्य करण्यात आला होता. सदर रक्कम सन २०१२-१३ ते सन २०१९-२० या कालावधीमध्ये वितरीत करण्यात आली आहे. तद्नंतर सदरची योजना बंद करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांतील हजारो जागा रिक्त असल्याबाबत

**(२) * २३८६४ श्री.राजेश राठोड, श्री.सत्यजीत तांबे, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गतवर्षी ४६३ औषधनिर्माणशास्त्र पदवी (बॅचलर ऑफ फार्मसी) महाविद्यालयांमध्ये १४ हजार ३५५ जागा रिक्त असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमाच्या जागा मोठ्या प्रमाणात रिक्त असतानाही ५७ नवीन औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांना मान्यता देण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) राज्यात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या एकूण ४५३ संस्था होत्या व त्यांची एकूण प्रवेश क्षमता ३६,५३० होती. त्यापैकी २४,४८३ जागांवर विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले होते व १२,०४७ इतक्या जागा रिक्त राहिलेल्या होत्या.
(२) राज्यात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये ५७ पदवी अभ्यासक्रमाच्या नवीन संस्थांना मान्यता मिळालेली आहे, हे खरे आहे.

औषधनिर्माणशास्त्र पदवी आणि पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था सुरू करण्यासाठी फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, (पीसीआय) नवी दिल्ली या केंद्रीय स्तरावरील शिखर संस्थेकडून, अनिवार्य निकषांनुसार आवश्यक जागा, यंत्रसामुग्री, शिक्षकीय व शिक्षकेतर पदे हे निकष पूर्ण करणाऱ्या संस्थांनाच परवानगी देण्यात येते.

(३) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये राज्यात औषधनिर्माणशास्त्र पदवी आणि पदविका अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशाअभावी मोठ्या प्रमाणात रिक्त जागा राहिल्या. त्यामुळे औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची शिखर संस्था असलेल्या फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांना नवीन औषधनिर्माणशास्त्र पदविका व पदवी संस्थांना मान्यता देण्यात येऊ नये. तसेच, विद्यमान संस्थांमध्ये सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमते मध्ये वाढ व नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्यात येऊ नये, असे शासनस्तरावरुन फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिनांक १२/०२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये, शासनास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था, प्रवेश क्षमता वाढ तसेच नवीन अभ्यासक्रमास मान्यता न देणेबाबत कळविले होते.

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली व शासनाने घेतलेल्या वरील भूमिकेविरोधात २० संस्थांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई, तसेच खंडपीठ औरंगाबाद व नागपूर येथे रिट याचिका दाखल केल्या होत्या. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र.३५४६/२०२४, ३४८२/२०२४ इतर ४ याचिकांवर दिनांक ०२/०५/२०२४ रोजी अंतरिम आदेश दिले व त्यांनी फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या दिनांक १२/०२/२०२४ रोजीच्या पत्रास स्थगिती दिली आहे. त्यास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता निकषांची पूर्तता करणाऱ्या संस्थांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जे. जे. समूह रुग्णालयाच्या इमारतीच्या देखभाल / दुरुस्तीच्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३) * २२९२४ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.जयंत पाटील, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभागाने जे. जे. समूह रुग्णालयाच्या इमारतीच्या देखभाल/दुरुस्तीची कामे कागदोपत्री दाखवून ३४ कोटी रुपयांची देयके सादर केली असून, सदर कामांचे वाटप करताना ३३ टक्के कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंता, ३३ टक्के कामे मजुर संस्था आणि उर्वरित कामे खुल्या निविदेद्वारे करण्यात आली नसल्याने शासन निर्णयाचे उल्लंघन करण्यात आले असल्याचे दिनांक १२ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२१ व सन २०२२ मध्ये कोरोना कालावधीत निधी उपलब्ध झाला नसल्यामुळे माहे मार्च अखेर निधी उपलब्ध झाल्यानंतर त्या कामाची देयके देण्यात आली असून, सदर कामाचे आदेश दिनांक १ मार्च, २०२३ रोजी दिल्यानंतर प्रत्यक्ष कामाचा कालावधी, कामाची मोजमापे नोंदवून देयके देण्यात आली असेही बांधकाम विभागामार्फत सांगण्यात आले परंतु, ही कामे कोणत्या वर्षातील व त्याची देयके कधी दिली गेली याचे उत्तर बांधकाम विभागाने अद्याप दिले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या कामांच्या आदेशांची देयके दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजी काढण्यात आल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरून दिसून येत असून, काम दिल्यानंतर ते काम सात दिवसात पूर्ण कसे झाले याबाबतीत सार्वजनिक बांधकाम विभागाने अद्याप कोणतीही माहिती दिली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जे.जे.रुग्णालयाच्या देखभाल दुरुस्तीच्या कामात कोणताही गैरव्यवहार झाला नसल्याचा दावा सार्वजनिक बांधकाम विभागाने केला असून, सदर दाव्यावर मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी दक्षता व गुण नियंत्रण मंडळाला चौकशी करण्याचे आदेश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जे. जे. समूह रुग्णालयाच्या इमारतीची देखभाल /दुरुस्तीची कामे कागदोपत्री दाखवून ३४ कोटी रुपयांची देयके सादर करून गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषी कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) या प्रकरणी फेब्रुवारी, २०२४ मध्ये प्राप्त तक्रारीवर दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नाशिक यांना चौकशीस्तव आदेशित करण्यात आले आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संच मान्यतेच्या सुधारित निकषांचा शासन निर्णय रद्द करण्याबाबत

**(४) * २३४५३ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सत्यजीत तांबे, श्री.धीरज लिंगाडे, श्री.कपिल पाटील, श्री.अरुण लाड, श्री.राजहंस सिंह, श्री.निलय नाईक, श्रीमती उमा खापरे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, प्रा.राम शिंदे, श्री.किरण सरनाईक, श्री.सतिश चव्हाण, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने शाळांसाठी संच मान्यतेच्या सुधारित निकषांचा शासन निर्णय दिनांक १५ मार्च, २०२४ रोजी प्रसिध्द केला असून, त्यानुसार संच मान्यतेचे सुधारित निकष लागू करण्यात आले आहेत, सुधारित निकषानुसार १३५-१५० पेक्षा कमी पटसंख्या झाल्यास मुख्याध्यापकाचे पद रद्द होणार आहे, तसेच या शासन निर्णयामधील प्रस्तावित बाबींमुळे सर्व व्यवस्थापनाच्या अनुदानित आणि अंशत: अनुदानित शाळांना पदे मंजूर केल्यास शिक्षकांची संख्या कमी होऊन हजारो शिक्षक अतिरिक्त ठरणार आहेत, या सुधारित संच मान्यतेमुळे २० पटाच्या १५ हजार शाळा एक शिक्षकी, तर ३० हजार

शाळा दोन शिक्षकी होणार असल्याने अनेक शैक्षणिक समस्या निर्माण होणार असून मराठी माध्यमांच्या शाळांची पटसंख्या खालावत असताना शाळांचा हजेरीपट ५०० पेक्षा जास्त असेल तरच चित्रकला, संगीत व कार्यानुभव या विषयासाठी शिक्षक देण्याचा निर्णय घेण्यात आला असून या निर्णयामुळे संगीत आणि चित्रकलेची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्याची बाब माहे मार्च, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २० पेक्षा कमी पट संख्या असलेल्या १५ हजार ५३९ शाळांतील इयत्ता पहिली ते चौथी किंवा पहिली ते पाचवीच्या वर्गांसाठी केवळ एकच शिक्षक उपलब्ध होईल तर २१ ते ६० पट संख्या असलेल्या, परंतु इयत्ता पहिली ते चौथी किंवा पहिली ते पाचवीचे वर्ग असलेल्या २९ हजार ७८६ शाळांना केवळ दोन शिक्षक उपलब्ध होतील, म्हणजेच एका शिक्षकाला एकाचवेळी दोन ते तीन वर्गांना अध्यापन करावे लागेल तसेच प्राथमिक शाळेत ६० पर्यंतच्या पटसंख्येला केवळ एकच शिक्षक मंजूर असून दुसरे पद सेवानिवृत्त शिक्षकाची नियुक्ती करुन भरणे हे नियमबाह्य असल्याने इयत्ता पाचवी ते आठवीचा पट २० पेक्षा कमी असल्यास तिथे शिक्षकाचे एकही पद मंजूर होणारे नसल्याने ग्रामीण, आदिवासी भागातील हजारो माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांना शिक्षक मिळणार नाही अशीही भिती व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरी, ग्रामीण, डोंगराळ, आदिवासी, नक्षलग्रस्त अशा भिन्न परिस्थिती असलेल्या शाळांसाठी एक समान निकष असल्यामुळे पुरेशा संख्येने शिक्षक उपलब्ध होण्याची शक्यता कमी होऊन मराठी माध्यमांच्या शाळांवर इंग्रजीच्या अतिक्रमणामुळे पटसंख्या पूर्तीचे संकट उद्भवले असताना सदरील निकषामुळे २५ हजारांहून अधिक शाळा मुख्याध्यापकांविना कार्यरत राहतील अशी भिती शिक्षक संघटनेकडून केली जात आहे तसेच शासनाचे नवीन संच मान्यतेचे नियम शिक्षण धोरणाच्या विरुध्द असून हे धोरण अंमलात आणल्यास शिक्षकांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी होण्याची तसेच मराठी शाळा बंद होण्याचा धोका निर्माण होऊन बेरोजगारीत वाढ होण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे शिक्षण क्षेत्रातून राज्य शिक्षण सेनेच्या अध्यक्षांनी तसेच महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद अहमदनगर जिल्ह्याच्या वतीने मा.शालेय शिक्षण मंत्री व शिक्षण सचिव यांनी संच मान्यतेच्या सुधारित निकषांचा शासन निर्णय रद्द करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे मार्च, २०२४ मध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ च्या शासन निर्णयात माध्यमिक शाळेतील (वर्ग ९ वी व १० वी) मुख्याध्यापक पदास १०० पेक्षा अधिक विद्यार्थी झाल्यास मुख्याध्यापकाचे पद अनुज्ञेय होते परंतु सदर शासन निर्णयात मुख्याध्यापक / उपमुख्याध्यापक / पर्यवेक्षक पदे माध्यमिक शाळांबाबत इयत्ता पहिली ते पाचवी ते इयत्ता दहावी, किंवा इयत्ता बारावी आणि इयत्ता आठवी ते इयत्ता दहावी किंवा बारावी करीता मुख्याध्यापक पद हे किमान १५० विद्यार्थी संख्येवर मंजूर करण्यात येणार आहे, तसेच कला, संगीत, कार्यानुभव शिक्षकांचे पद मान्यतेबाबत विद्यार्थी पटसंख्येची अट शिथिल करणे तसेच सरसकट सर्व शाळांवर नेमणूक करणे व सुधारित संच मान्यतेच्या निकषात पटसंख्येअभावी पद कमी होणाऱ्या पर्यवेक्षक/उपमुख्याध्यापक या पदांना सेवानिवृत्तीपर्यंत संरक्षण आहे परंतु पद कमी होत असल्यास मुख्याध्यापक पदास संरक्षण नाही त्याचे समायोजन शिक्षक पदावर करण्यात येईल, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सुधारित निकषातील तरतुदीचे विश्लेषण करून या शासन निर्णयातील त्रुटी आणि होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करून कमी पट संख्येच्या शाळांमध्ये शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी वर्गनिहाय शिक्षक देऊन

शाळा तेथे मुख्याध्यापक पद आणि प्रत्येक विषयाला शिक्षक मिळण्यासाठी दिनांक १५ मार्च २०२४ रोजीचा शासन निर्णय रद्द करण्याची मागणी शिक्षक भारती आणि इतर शिक्षक संघटनांनी केल्यानुसार तसेच कला, संगीत, कार्यानुभव शिक्षकांचे पद मान्यतेबाबत विद्यार्थी पटसंख्येची अट शिथिल करुन त्याची सरसकट सर्व शाळांवर नेमणूक करणेबाबत या मागणीवर चौकशी करण्याबाबत तसेच सुधारित संच मान्येतेचे निकष रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) अंशत: खरे आहे.
(५) संच मान्यतेच्या सुधारीत निकषांचा शासन निर्णय रद्द करणे व त्यामध्ये बदल करणे या संदर्भात विविध संघटनांकडून शासन स्तरावर निवेदने प्राप्त झाली आहेत. सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने आयुक्त (शिक्षण) यांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सातव्या वेतन आयोगाचे प्रलंबित हप्ते अदा करणेबाबत

**(५) * २३०४८ श्री.किरण सरनाईक, श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ नंतर सेवेत रुजू झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे डीसीपीएस, एनपीएस किंवा जीपीएफ असे कोणतेही खाते नसल्याने त्यांना प्रलंबित सातव्या वेतन आयोगाचे हप्ते मा.शिक्षण संचालक यांच्या कार्यालयाच्या दिनांक ३ जुलै, २०२३ व दिनांक १० ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या पत्रानुसार अदा केलेले नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षण संचालक यांच्या कार्यालयाच्या सदर पत्रांनुसार सन २००५ नंतरच्या डीसीपीएस, एनपीएस किंवा जीपीएफ असे कोणतेही खाते नसलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती मागविलेली असूनही पुढील प्रक्रिया सुरु करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे डीसीपीएस, एनपीएस किंवा जीपीएफ असे कोणतेही खाते नाहीत त्यांना शिक्षण संचालक यांच्या कार्यालयाच्या दिनांक ३ जुलै, २०२३ व दिनांक १० ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या पत्रानुसार कार्यवाही करून प्रलंबित असलेले सातवा वेतन आयोगाचे हप्ते अदा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.
(३) शिक्षण संचालकांकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर वित्त विभागाचे अभिप्राय घेऊन कार्यवाही करण्याची बाब नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(६) * २३५९८ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक १९८४३ ला दिनांक २५ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र व गोवा राज्याला जोडणारा व कोकण विकासाच्या दृष्टीने महत्वाचा असणाऱ्या मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम गेल्या अनेक वर्षांपासून अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इंदापूर ते झाराप या लांबीच्या प्रारुप आराखड्यास माहे जून २०१३ मध्ये केंद्र शासनाकडून मंजुरी प्राप्त झाली व तद्नंतर या लांबीमधील ८०% ते ९०% संपादीत जागा ताब्यात घेतली असून यावर आतापर्यंत रुपये ३३७४.११ कोटी एवढा खर्च झालेला असून सद्य:स्थितीत ७५ टक्के काम पूर्ण झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उर्वरित रस्त्याचे काम पूर्ण करुन मुंबई-गोवा महामार्ग सक्षमपणे वाहतुकीसाठी खुला करण्यासाठी कोणती कार्यवाही/उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे अंशत: खरे आहे.

(अ) मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गा दरम्यान पनवेल ते इंदापूर (किमी ०/०० ते किमी ८४/६००) ही लांबी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारित आहे. पनवेल ते कासू (किमी ० ते किमी ४२/३००) या लांबी मधील काम जवळपास पूर्ण झाले असून फक्त सेवा रस्ते व गडब येथील भुयारी मार्गाचे काम प्रगतीपथावर आहे व कासु ते इंदापूर (किमी ४२/३०० ते किमी ८४/६००) या लांबीमधील ७२ टक्के काम पूर्ण झाले असून भुयारी मार्ग, उड्डाणपुलांचे काम प्रगतीपथावर आहे.

(ब) इंदापूर ते झाराप (किमी ८४/६०० ते किमी ४५०/१७०) ही लांबी राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अखत्यारीत आहे. या लांबीमधील ८५% काम पूर्ण झालेले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

इंदापूर ते झाराप या लांबीमध्ये एकूण १० पॅकेजेसच्या कामांसाठी मंजूर असलेल्या एकूण रुपये ६१००.४४ कोटी एवढ्या रक्कमेपैकी आजपावेतो रुपये ३५८०.३३ कोटी एवढा खर्च झालेला आहे. एकूण ३५५.२८ किमी संकल्पित लांबी पैकी २९५.४०२ किमी लांबीचे काम (सुमारे ८५%) पूर्ण झालेले आहे.
(३) महामार्गाचे काम जलद गतीने पूर्ण होण्यासाठी वरिष्ठ स्तरावर वारंवार बैठका घेण्यात येवून आवश्यकतेनुसार पर्यायी कंत्राटदार नेमण्यात आले आहेत व कामे प्रगतीपथावर आहे. सदर काम डिसेंबर, २०२४ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर मध्ये कांद्याची लहान बाजारपेठ (मिनी मार्केट) स्थापन करणेबाबत

**(७)** * **२३८५४ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर बाजार समिती मध्ये दररोज ६०० ते ८०० गाडी कांदा विक्रीस येत असून दिवसेंदिवस कांद्याची आवक वाढत असल्याने बाजार समितीत कांदा बाजारात ठेवण्यासाठी जागा अपुरी पडत असल्यामुळे बाजार समितीतील परिसरात वाहतूक कोंडी होत असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याचे माहे मार्च-एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याचा परिणाम भुसार व भाजीपाला, फळ मार्केटवर होत असल्यामुळे कांदा बाजार शहराबाहेर हलविणे गरजेचे असल्याने बाजार समितीने ५० एकर जागेवर लहान बाजारपेठ (मिनी मार्केट) स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर लहान बाजारपेठ (मिनी मार्केट) स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सोलापूर मधील कांद्याच्या लहान बाजारपेठेच्या (मिनी मार्केट) प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) होय.

(२) होय,

बाजार समितीने दिनांक १२/०१/२०२४ रोजीच्या सर्वसाधारण सभेतील ठराव नं.२७ नुसार बाजार समितीच्या श्री.सिध्देश्वर बाजार पेठ या मुख्य बाजार आवारात कांदा या नियंत्रित शेतीमालाची आवक मोठ्या प्रमाणात होत असल्याने कांदा या नियंत्रित शेतीमालाच्या व्यवसायासाठी बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात तसेच वाहतुकीच्या सोईच्या दृष्टिने राष्ट्रीय महामार्गालगत मुख्य बाजार पेठेच्या जवळपास ५० एकर इतकी स्वतंत्र जागा खरेदी करणेस मंजुरी मिळणेचा प्रस्ताव खात्याकडे सादर करण्यात यावा असा निर्णय सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीने घेतलेला आहे.

(३) व (४) नाही,

सोलापूर बाजार समितीच्या दिनांक १६/०१/२०२४ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांचेकडून पणन संचालनालयाकडे प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. सदरचा प्रस्ताव त्रोटक स्वरुपाचा असल्याने पणन संचालनालयाने दिनांक १०/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्या दिनांक १०/०२/२०२२ रोजीच्या परिपत्रकातील नमुद कार्यपध्दतीनुसार कागदपत्रांची पुर्तता बाजार समितीकडून करुन घेऊन परिपूर्ण प्रस्ताव स्वयंस्पष्ट अभिप्रायासह पणन संचालनालयास सादर करण्याबाबत कळविलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांमध्ये सॅनिटरी पॅड वेंडिंग व डिस्पोजल मशीन कार्यान्वित करण्याबाबत

**(८) * २३०१३ श्री.प्रवीण दटके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या (एमपीएसपी) वतीने समग्र शिक्षा अभियानांतर्गत शाळांमध्ये सॅनिटरी पॅड वेंडिंग व डिस्पोजल मशीन उपलब्ध करून देण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने आदेशित केले असूनही सदर मशीन अद्यापही कार्यान्वित केले नसल्याची बाब दिनांक १५ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपरिषद, आश्रम शाळा अशा ३६१ शाळांमध्ये माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या माध्यमातून सॅनिटरी पॅड वेंडिंग व पॅड डिस्पोजल मशीनचा पुरवठा झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शाळांमध्ये या मशीन्सचा पुरवठा होऊनही त्या अद्यापही स्थापित केल्या नसल्याच्या लेखी तक्रारी शिक्षणाधिकारी यांना प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शाळांमध्ये सॅनिटरी पॅड वेंडिंग व पॅड डिस्पोजल मशीन कार्यान्वित करणेबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) सन २०२२-२३ या वर्षामध्ये समग्र शिक्षांतर्गत राज्यातील ९,९४० शाळांमध्ये (८,८४९ उच्च प्राथमिक शाळा व १,४९१ माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा) किशोरवयीन मुलींसाठी Sanitary Pads Vending Machines and Incinerator उपलब्ध करून देण्याकरीता भारत सरकारने तरतूद मंजूर केली आहे. त्यानुसार, Sanitary Pads Vending Machines and Incinerator चा पुरवठा करण्यात आला आहे.

(२), (३) व (४) नागपूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपरिषद, आश्रम शाळा अशा ३६१ शाळांमध्ये Sanitary Pads Vending Machines and Incinerator चा पुरवठा करण्यात आला आहे.

तथापि, ६८ शाळांमध्ये मशिन्स कार्यान्वित नसल्याची बाब निदर्शनास आलेली आहे. याबाबत सबंधीत पुरवठादारास मशीन तात्काळ कार्यान्वित करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधीची खाती ऑनलाईन करणेबाबत

**(९) * २२९५० श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीचे खाते ऑनलाईन केले नसल्यामुळे कपात झालेल्या रकमेचा हिशोब मिळण्यास विलंब होत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास भविष्य निर्वाह निधीच्या खात्याचा हिशोब न मिळाल्याने शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बदलीनंतर भविष्य निर्वाह निधी वर्ग करण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधीची खाती ऑनलाईन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) याबाबत क्षेत्रिय स्तरावर विशेष कार्यशाळा घेण्याबाबत आयुक्त (शिक्षण), पुणे व संचालक (प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे यांना कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील महाविद्यालयांसाठीचा आराखडा ठरविण्याकरीता समिती गठीत केल्याबाबत

**(१०) * २३२२७ श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात पदवी आणि पदविका अभ्यासक्रमांच्या शेकडो जागा रिक्त असल्याने या शैक्षणिक वर्षात एकही नवीन महाविद्यालय सुरु केले जाणार नसल्याची भूमिका तंत्र शिक्षण संचालनालयाने घेतली असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०३० पर्यंत नवीन महाविद्यालयांसाठीचा आराखडा ठरविण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने ११ तज्ञ सदस्यांची समिती गठीत केली असल्याचे त्याच सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाविद्यालयांसाठीचा आराखडा ठरविण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने गठीत केलेल्या समितीने शासनास अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४), असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करुन गठीत केलेल्या समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये राज्यात औषधनिर्माणशास्त्र पदवी आणि पदविका अभ्यासक्रमाच्या अनुक्रमे १२,०४७ व ९,७९३ जागा प्रवेशाअभावी रिक्त राहिल्या होत्या. यास्तव, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता नवीन औषधनिर्माणशास्त्र संस्था सुरु करणे तसेच, विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे व विद्यमान अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास मान्यता देऊ नये, अशी राज्य शासनाने डिसेंबर, २०२३ मध्ये फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांना विनंती केली होती.

(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील २१८ खाजगी शाळा आरटीईच्या मान्यतेशिवाय सुरु असल्याबाबत

**(११)** * **२३६२७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सचिन अहिर, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील एकूण २१८ खाजगी शाळा आरटीईच्या मान्यतेशिवाय सुरु असल्याने संबंधित शाळांची तपासणी करुन, सदर शाळांची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव पाठविण्यात यावा असे आदेश माहे जानेवारी, २०२४ मध्ये उपसंचालक, मुंबई यांना देण्यात आले आहेत तसेच या प्रकाराला शिक्षणाधिकारी जबाबदार असल्याचा अहवाल मुंबई विभागीय उपसंचालनालयाने संचालकांना सादर केला असल्याचेही माहे मार्च, २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक शाळेने दर तीन वर्षांनी आरटीईची मान्यता घेणे अनिवार्य असतानाही, मान्यतेशिवाय शाळा सुरु ठेवणाऱ्या शाळांची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव देण्याची तरतूद असताना महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने सदर अहवालात या शाळांविरोधात कारवाईचे सर्व अधिकार शिक्षणाधिकाऱ्यांकडे असूनही मान्यतेशिवाय शाळा सुरु ठेवणाऱ्या तसेच आरटीईची मान्यता न घेणाऱ्या शाळांवर कारवाई व दंड वसूल करण्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अंशतः खरे आहे.

शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी राज्यातील अनधिकृत शाळांवर शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करणेबाबत दिनांक ११/०१/२०२४ रोजीच्या पत्रान्वये विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग यांना कळविले होते. त्यानुषंगाने विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग यांनी दिनांक ०७/०३/२०२४ रोजीच्या पत्रान्वये शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांना अहवाल सादर केला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिका परिक्षेत्रातील खाजगी अनुदानित व विनाअनुदानित २१८ शाळांपैकी १९२ शाळांना आरटीईची मान्यता देण्यात आली आहे. उर्वरित २६ शाळांपैकी ७ शाळा बंद झालेल्या असून १९ शाळांना आरटीईची पुनर्मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत

**(१२) * २२९३५ श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.सुधाकर अडबाले, श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबतचे परिपत्रक निर्गमित केले असून, काही नामांकित महाविद्यालये विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करीत नसल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करत नसलेल्या महाविद्यालयांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## थळ (जि.रायगड) येथील राष्ट्रीय केमिकल आणि फर्टीलायझर कंपनीची कुरूळ येथील शाळा आगामी शैक्षणिक वर्षापासून बंद करण्यात येत असल्याबाबत

**(१३) * २३४१७ श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) थळ (जि.रायगड) येथील राष्ट्रीय केमिकल आणि फर्टीलायझर कंपनीच्या सरखेल कान्होजी आंग्रे निवासी वसाहतीमधील गेल्या ४२ वर्षांपासून ज्ञानदानाचे काम करणारी राष्ट्रीय केमिकल आणि फर्टीलायझर कंपनी (आरसीएफ) प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, कुरूळ ही माहे जून, २०२४ च्या शैक्षणिक वर्षापासून बंद करण्याचा निर्णय राष्ट्रीय केमिकल आणि फर्टीलायझर कंपनी (आरसीएफ) व्यवस्थापनाने घेतला असल्याने हजारो कामगारांच्या मुलांना इतरत्र शिकण्यासाठी जावे लागणार असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळा बंद करताना राष्ट्रीय केमिकल आणि फर्टीलायझर कंपनी (आरसीएफ) व्यवस्थापनाने शालेय शिक्षण विभागाकडे कोणताही प्रस्ताव न पाठविता एक मार्गी निर्णय घेतल्याने कामगार वर्गात नाराजी व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, देशातील कंपन्यांना कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) फंडाच्या माध्यमातून खर्च करण्यास परवानगी असतानाही केवळ लेखा विभागाचे आक्षेप येऊ नयेत म्हणून या शाळा बंद करण्याबाबत विनापरवानगी घेतलेले निर्णय मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही / उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१), (२) व (३) राष्ट्रीय केमिकल फर्टीलायझर कंपनीच्या प्रशासनाने दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४ रोजी कुरुळ वसाहतीमधील आर.सी.एफ प्राथमिक शाळा व आर.सी.एफ. माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा आगामी काळात बंद करण्याचा निर्णय घेतला असून नवीन शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून आर.सी.एफ शाळेत इ.१ ली ते १२ वीतील नवीन प्रवेश बंद करण्यात येत असल्याबाबत शिक्षणाधिकारी यांना कळविले होते. मात्र तद्नंतर राष्ट्रीय केमिकल फर्टीलायझर कंपनीच्या प्रशासनाकडून सदर पत्र मागे घेण्यात आले असून दिनांक ३०/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये शाळा पुर्ववत चालू ठेवण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत आरसीएफ या शाळेने सन २०२४-२५ या वर्षातील नवीन प्रवेश प्रक्रिया पुर्ववत ठेवून दिनांक १५ जून, २०२४ पासून शाळा नियमित सुरु केलेली असून शाळेतील पट संख्या ७३१ आहे.
(४) वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

-----------------

## कन्नड (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील शिधापत्रिकाधारकांचे आधारकार्ड व शिधापत्रिका लिंक करताना चुकीच्या पध्दतीचा अवलंब केल्याबाबत

**(१४) * २३९०१ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या शिधापत्रिका व आधारकार्ड लिंक करण्याच्या निर्णयानुसार कन्नड (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील पुरवठा विभागाने शिधापत्रिकाधारकांचे आधारकार्ड व शिधापत्रिका लिंक करताना चुकीच्या पध्दतीचा अवलंब केल्यामुळे अनेक शिधापत्रिकाधारकांचे नाव गुजरात राज्यातील शिधापत्रिकाधारक कुटुंबियांच्या यादीत समाविष्ट केल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कन्नड तालुक्यातील अनेक शिधापत्रिकाधारकांना मिळणाऱ्या सवलती बंद झालेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कन्नड तालुक्यातील शिधापत्रिकाधारकांनी सदर बाब पुरवठा विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून दिली असता त्यांनी गुजरात राज्यातील शिधापत्रिकाधारक कुटुंबियांच्या यादीत समाविष्ट करण्यात आलेली नावे कमी करुन आणण्याबाबत सूचना केल्यामुळे नागरिकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने चुकीच्या पध्दतीचा अवलंब करुन आधारकार्ड व शिधापत्रिका लिंक करणाऱ्या पुरवठा विभागाच्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करुन कन्नड तालुक्यातील

शिधापत्रिकाधारकांना मिळणाऱ्या सवलती सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) सर्व शिधापत्रिका धारकांना योजनेचा लाभ देणे सुरू असून पात्र लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित राहणार नाही, यांची काळजी घेण्यात येत आहे.
(३) हे खरे नाही.
(४) ता.कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर मधील श्री. आशिष कैलासचंद अजमेरा या एका लाभारर्थ्याचे आधार क्रमांक गुजरात राज्यातील शिधापत्रिकेशी संलग्न झाल्याचे निदर्शनास आले होते. तथापि, संबंधित लाभधारकाचे आधार गुजरात राज्यातील शिधापत्रिकेमधून कमी करण्यत आले असून लाभार्थ्याला राज्यातील शिधापत्रिकेत समाविष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार लाभार्थ्याला नियमोचित लाभ देण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यात काजू बोर्ड स्थापन करण्याबाबत

**(१५) * २३७४५ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड, आजरा, भुदरगड आणि गडहिंग्लज या चार तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर काजू बियांचे उत्पादन होत असल्याने काजू बोर्डाची स्थापना करुन चंदगड येथे मुख्यालय स्थापन करण्याचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाने शासनाकडे सादर केला असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चंदगड, आजरा, भुदरगड आणि गडहिंग्लज या तालुक्यांमधील काजूचे मोठ्या प्रमाणात होणारे उत्पादन तसेच काजूची वाढती मागणी याचा विचार करुन शासनाने कोल्हापूर येथे काजू बोर्ड स्थापन करुन चंदगड येथे मुख्यालय स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच या बोर्डाचे मुख्यालय अन्य जिल्ह्यात स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) काजू बोर्डाची स्थापना करुन चंदगड येथे मुख्यालय स्थापन करण्याचा प्रस्ताव कोल्हापूर जिल्हा प्रशासनाकडून या विभागास प्राप्त झालेला नाही.

मात्र, मा.लोकसभा सदस्य श्री.संजय मंडलिक यांनी काजू बोर्डाचे मुख्यालय चंदगड, जि.कोल्हापूर येथे स्थापन करण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २४ मे, २०२३ रोजी पत्र दिले असून, सदर पत्र कृषी विभागास पाठविण्यात आले होते. कृषी विभागाने सदर पत्र त्यांच्या क्षेत्रिय कार्यालयामार्फत पणन संचालनालयास पाठविले.

(२) पणन विभागाच्या दिनांक १६ मे, २०२३ च्या शासन निर्णयान्वये "महाराष्ट्र राज्य काजू मंडळ" स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली असून काजू मंडळाचे मुख्यालय वाशी, नवी मुंबई येथे तर रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथे विभागीय कार्यालये स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली होती.

तदनंतर कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड व आजरा तालुक्यातील काजूचे उत्पादन विचारात घेता, चंदगड येथेही काजू मंडळाचे विभागीय कार्यालय स्थापन करण्यास दिनांक १३ ऑक्टोबर, २०२३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

मात्र, काजू उत्पादन क्षेत्राच्या मध्यवर्ती ठिकाणी काजू मंडळाचे मुख्यालय असणे आवश्यक असल्याने, काजू मंडळाचे मुख्यालय वाशी, नवी मुंबई ऐवजी प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग येथे स्थापन करण्यास दिनांक ०१ मार्च, २०२४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व शालेय विद्यार्थ्यांची आधार कार्ड पडताळणी पूर्ण करण्याबाबत

**(१६) * २३३०५ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील केंद्र शासनाच्या यु-डायस प्रणालीत शाळा, विद्यार्थी, शिक्षक आदी माहिती अपूर्ण असताना विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड नसल्याने अनेक शासकीय योजनांपासून वंचित राहण्याची निर्माण झालेली परिस्थिती, २ कोटी १२ लाख ५५ हजार ३५ शालेय विद्यार्थ्यांना विविध योजनांचा लाभ देण्यासाठी आवश्यक असलेल्या आधार कार्ड पडताळणीसाठी दिनांक ३० मार्च ही अंतिम मुदत देण्यात आली असतानाही जवळपास १ कोटी ९४ लाख ६९ हजार २१५ विद्यार्थ्यांचे आधारकार्ड पडताळणी झाली असल्याने जवळपास १२ लाख मुले शासनामार्फत देण्यात येणाऱ्या गणवेश व अन्य योजनांपासून वंचित राहणार असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्षात १ कोटी ९४ लाख ६९ हजार २१५ विद्यार्थ्यांचे आधारकार्ड वैध ठरले असून १२ लाख ३६ हजार ४८४ विद्यार्थांचे आधारकार्ड अवैध असल्याचे निदर्शनास आले असून ५ लाख १७ हजार २३२ विद्यार्थ्यांनी अद्याप आधार क्रमांक शालेय शिक्षण विभागाला उपलब्ध करून दिलेला नसल्यामुळे नव्या सत्रातील गणवेशासह शालेय पोषण आहाराच्या निधीमध्ये कपात होऊन त्यांना या दोन्ही लाभांपासून वंचित रहावे लागणार असल्याने विधानपरिषदेच्या मा.उपसभापती यांनी शालेय शिक्षण विभागाच्या सचिव यांना शाळानिहाय शिबिरे घेऊन आधारकार्ड काढून द्यावे असे निर्देश दिलेले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे चौकशीच्या अनुषंगाने आधारकार्ड पडताळणी नसल्यामुळे नव्या सत्रातील लाखो विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार व गणवेश देता येणार नसल्याने शालेय शिक्षण विभागाकडून आधारकार्ड पडताळणीकरीता

सवलत देण्याबाबत तसेच सर्व शालेय विद्यार्थ्यांचे शिबीर घेऊन आधारकार्ड पडताळणी पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री.दिपक केसरकर :** (१), (२) व (३) राज्यातील शिक्षण घेत असलेल्या २,१२,२८,६७६ विद्यार्थ्यांची आधार पडताळणीअंती २,००,८६,६७१ वैध ठरले आहेत. उर्वरीत ११,४२,००५ विद्यार्थ्यांपैकी ३,३४,१८२ विद्यार्थ्यांकडे आधार क्रमांक नसून ८,०७,८२५ विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकाच्या माहितीमध्ये विसंगती असल्याने त्यामधील त्रुटी/ तफावत दूर करून आधार क्रमांक वैध करण्याबाबत पुढील कार्यवाही शाळास्तरावर सुरू आहे.

राज्यातील विद्यार्थ्यांचे आधारकार्ड १०० टक्के काढणे व आधारक्रमांकाची पडताळणी करण्याची कार्यवाही करण्यात येत असून, विद्यार्थ्यांची आधार क्रमांक पडताळणी न झाल्यामुळे गणवेश व अन्य योजनांपासून वंचित ठेवण्यात येत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## समृद्धी महामार्गावर झालेल्या अपघातामधील मृतांच्या कुटुंबियांना पाच लाख रुपयांची मदत मिळण्याबाबत

**(१७) * २३५०६ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) समृद्धी महामार्गावर झालेल्या अपघातांमधील मृतांच्या कुटुंबियांना पाच लाख रुपयांच्या मदतीची घोषणा मा.मुख्यमंत्री महोदयांनी केली असून याबाबतचे कोणतेही अधिकृत परिपत्रक काढण्यात न आल्याची बाब नागपूर खंडपीठात सादर केलेल्या माहितीमधून माहे मार्च, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची माहिती मा.मुख्यमंत्री कार्यालयाने दिली असल्याची बाब माहिती अधिकारातून निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, समृद्धी महामार्गावरून प्रवास करताना झालेल्या अपघातामधील मृतांच्या कुटुंबियांना तातडीने मदत उपलब्ध करुन देणेबाबत तसेच महामार्गावरून प्रवास करताना थांबे करुन व महामार्गालगत पुरेशी शौचालये उभारून या शौचालयांची देखभाल दुरुस्ती महामार्ग प्राधिकरणाने करून पेट्रोल पंपावर ही सर्व सुविधा पुरविण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) मृतांच्या कुटुंबियांना / वारसांना जिल्हाधिकारी मार्फत मा.पंतप्रधान सहाय्यता निधी अंतर्गत रुपये दोन लक्ष प्रमाणे मृतांच्या कुटुंबियांना/वारसांना तसेच मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत प्रत्येकी रुपये पाच

लक्ष प्रमाणे वाटप करण्यात आले आहे, असे बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कळविण्यात आलेले आहे. तसेच समृद्धी महामार्गावर एकूण १६ इंधन स्थानके कार्यरत असून याठिकाणी इंधन, पाणी, स्वच्छतागृहे या प्रकारची सोय करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांच्या मुलांची बोगस हजेरी दाखवून वसतिगृह चालकांनी लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत**

**(१८) * २३०९८ श्री.अरुण लाड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यातील ८ लाख कामगार परराज्यात ऊसतोडणीकरीता जात असल्याने त्यांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी समग्र शिक्षा अभियानांतर्गत २२० हंगामी वसतिगृहे सुरु करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील वसतिगृहांची तपासणी केली असता अनेक मुलांची हजेरी बोगस दाखवून वसतिगृह चालकांनी लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बीड जिल्ह्यातील १८३९ विद्यार्थी हे कोल्हापूर जिल्ह्यात ऊसाच्या शेतामध्ये पालकांसोबत काम करीत असतानाही त्यांची बीड जिल्ह्यातील वसतिगृहांच्या हजेरी पटावर बोगस हजेरी दाखविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बीड जिल्ह्यातील वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांची बोगस हजेरी हजेरीपटावर दाखवून गैरव्यवहार करण्याऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी समग्र शिक्षा अभियानांतर्गत बीड जिल्ह्यात एकूण १९७ हंगामी वसतिगृहे माहे ऑक्टोबर, २०२३ ते माहे मार्च, २०२४ या ऊसतोड हंगाम कालावधीत सुरु होती.
(२) हे खरे नाही.

सन २०२३-२४ मध्ये सुरु असलेल्या हंगामी वसतिगृहांची जिल्हास्तरावरील पर्यवेक्षीय यंत्रणेमार्फत दोन वेळा दिनांक २२ डिसेंबर, २०२३ व दिनांक २३ डिसेंबर, २०२३ रोजी प्रथम तपासणी व दिनांक १७ फेब्रुवारी, २०२४ व दिनांक १८ फेब्रुवारी, २०२४ रोजी द्वितीय तपासणी करण्यात आली. सदर तपासणीमध्ये आढळून आलेली विद्यार्थी संख्या व बायोमॅट्रीक उपस्थिती याचा ताळमेळ घेऊनच हंगामी वसतिगृहांना निधी वितरित करण्यात आला आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत ज्वारी पिकाचे हमी भाव केंद्र सुरु करणेबाबत

**(१९) * २३७२५ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ज्वारी पिकाचे हमी भाव केंद्र सुरु नसल्याने, सदर केंद्राअभावी शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत असल्याचे दिनांक १४ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगाव जिल्ह्यामधील शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्याकरीता कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ज्वारी पिकाचे हमीभाव केंद्र सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) अंशतः खरे आहे.

राज्य शासनाने दिनांक १५ फ़ेब्रुवारी, २०२४ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास सादर केलेल्या ज्वारी खरेदीच्या आराख़ड्यास केंद्र शासनाकडुन दिनांक २७ एप्रिल, २०२४ च्या पत्रान्वये मंजुरी प्राप्त झाली आहे.

(२) व (३) केंद्र शासनाकडुन मंजुरी प्राप्त झाल्यानंतर राज्य शासनाने दिनांक ९ मे, २०२४ च्या पत्रान्वये अभिकर्ता संस्थाना ज्वारी खरेदीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याकरीता उद्दिष्टे विभागुन दिली आहेत. त्यानुसार जळगाव जिल्ह्यात १८ खरेदी केंद्रांवर एकूण ३४९४ शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून आजअखेर एकूण १३५५०.०० क्विंटल इतकी ज्वारी खरेदी करण्यात आली आहे.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा व धडगाव तालुक्यांतील अनेक शाळा विद्युतीकरणापासून वंचित असल्याबाबत

**(२०) * २३७७२ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकुवा व धडगाव (जि.नंदुरबार) तालुक्यांतील शाळांमध्ये विद्युतीकरण उपलब्ध नसल्याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी मा.शिक्षण मंत्री यांना माहे डिसेंबर, २०२३ मध्ये निवेदन दिले असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने मा.शालेय शिक्षण मंत्री महोदयांनी विद्युतीकरणासंदर्भात कार्यवाही होण्याच्या दृष्टीने निर्देशीत केले असूनही अद्यापही विद्युतीकरणाअभावी सुमारे २०० शाळा या डिजिटल शाळा होऊ शकल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मा.शालेय शिक्षण मंत्री महोदयांनी विद्युतीकरणासंदर्भात कार्यवाही करण्याचे निर्देशीत केले असतानाही अद्यापही निर्देश अंमलात न आणणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच अक्कलकुवा व धडगाव

तालुक्यातील शाळांमध्ये विद्युतीकरण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबची करणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) अक्कलकुवा व धडगाव तालुक्यांतील शाळांमध्ये विद्युतीकरणाची कार्यवाही जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना (आकांक्षित जिल्हा) अंतर्गत धडगाव तालुक्यातील १०३ व अक्कलकुवा तालुक्यातील १०६ अशा एकूण २०९ जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना सोलर पावरद्वारे विद्युत सुविधा उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच, नंदुरबार जिल्ह्यातील एकूण १०३ शाळांचे विद्युतीकरणाचे कामकाज प्रगतीपथावर आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात बोगस शैक्षणिक संस्थांकडून बनावट गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र देण्यात येत असल्याबाबत

**(२१) * २३८१८ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नवे शैक्षणिक वर्ष सुरु होणार असतानाच अनेक ठिकाणी बोगस शैक्षणिक संस्था सक्रिय झाल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यार्थ्यांना झटपट पदवी मिळवून देण्याचे काम संस्थेकडून सुरु असून मुंबई विद्यापीठाची गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र घरबसल्या फक्त एका दिवसांत १० ते १२ हजार रुपयांत मिळत असल्याने बनावट गुणपत्रिका व पदवी देणाऱ्यांपासून विद्यार्थ्यांनी सावध रहावे, असे आवाहनही मुंबई विद्यापीठ प्रशासनाकडून करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या बनावट गुणपत्रिकेबाबत मुंबई विद्यापीठ प्रशासनाने वांद्रे – कुर्ला संकुल (बीकेसी) पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली असून पोलीस याबाबत अधिक चौकशी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बनावट गुणपत्रिका देणाऱ्या तसेच झटपट पदवी मिळवून देण्याऱ्या बोगस शिक्षण संस्थांवर आणि संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशतः खरे आहे.
(३) हे खरे आहे. व (४) एप्रिल, २०२४ मध्ये दै. पुणे मिरर या वृत्तपत्रामध्ये रुपये २०००/- च्या मोबदल्यात मुंबई विद्यापीठाची डिग्री या शिर्षकाखाली वृत्त प्रकाशित झाले होते. पुणे येथील एक व्यक्तिने फेसबुक या समाजमाध्यमावर मुंबई विद्यापीठाची पदवी घरी बसून एका दिवसात १० ते १२ हजारात मिळेल अशी जाहिरात पाहिली त्यास अनुसरुन जाहिरातीत नमूद फोन नंबर वर त्याने संपर्क केला असता ॲडव्हान्स रुपये

२०००/- ची मागणी करण्यात आली. त्या व्यक्तिने ॲडव्हान्स रुपये २०००/- भरल्यानंतर त्या व्यक्तिच्या व्हॉट्सॲपवर मुंबई विद्यापीठाची बी.एस्सी. ची गुणपत्रिका पाठविण्यात आली. विद्यापीठाने सदर माहितीची दखल घेतली असून फोटोशॉप किंवा इतर साधनांचा वापर करुन बनावट पदवी किंवा गुणपत्रिका तयार करण्यात आली असून ज्या व्यक्तींनी ही गुणपत्रिका घेतली आहे ती एप्रिल, २०२३ ची बी.एस्सी. सत्र ६ ची कथित गुणपत्रिका असून त्यावर जुन्या पुर्वीच्या परीक्षा संचालकांची स्वाक्षरी आहे. त्यामुळे ती बनावट आहे. याबाबत विद्यापीठाने बांद्रा-कुर्ला संकुल पोलीस स्टेशन येथे लेखी तक्रार केली आहे. तसेच, अशा बनावट गुणपत्रिका व पदवी देणाऱ्यांपासून सावध रहावे असे आवाहन मुंबई विद्यापीठाने केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पाली (ता.सुधागड, जि.रायगड) येथील बाह्यवळण रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२२) * २३२७१ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाली (ता.सुधागड, जि.रायगड) येथील बाह्यवळण मार्गाला १४ वर्षांपूर्वी मंजुरी दिली असून, सदर बाह्यवळण रस्त्यासाठी शासनाने १८ कोटी रुपये तर भूसंपादनासाठी १० कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी दिली असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाली बाह्यवळणाच्या भूसंपादनासाठी ९ हेक्टर जागा भूसंपादित करण्यात आली असून पाली, बलाप, बुरमाळी, झाप येथील भूसंपादन जागेचे मुल्यांकन करण्याकरीता जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील बलाप, बुरमाळी, झाप येथील भूसंपादन जागेचे मूल्यांकन करण्याकरीता जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे सादर केलेल्या प्रस्तावावर जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडून कोणती कार्यवाही केली तसेच सदर बाहयवळण मार्गास १४ वर्षांपूर्वी मंजूरी देऊनही अद्यापही बाहयवळण मार्गाचे काम न करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) पाली पाटणूस मार्ग रामा- ९४ पाली गावातील वळण रस्ता कि.मी. ०/०० ते ३/०० या रस्त्याच्या भूसंपादनाकरीता रुपये १० कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) मौ. झाप व बुरमाळी या गावांच्या मुल्यांकनास जिल्हास्तरीय मुल्यांकन समितीकडून मंजूरी मिळाली आहे. मौ. पाली व बलाप या प्रस्तावात त्रुटी असल्याने नव्याने प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

दरम्यान, बाधित शेतकऱ्यांच्या हरकतींमुळे मोजणी वेळेत न झाल्यामुळे तसेच रस्त्यांच्या आराखड्याबाबत शेतकऱ्यांमध्ये दुमत असल्याने भूसंपादन प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नव्हती. तथापि, यासंदर्भात सद्य:स्थितीत सहमती झाली असून भूसंपादनाची प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करणेचे नियोजन आहे.

-----------------

## चेंबूर (मुंबई) येथील 'स्वामी विवेकानंद हायस्कूल अँण्ड ज्युनिअर कॉलेज सिंधी सोसायटी' शाळेत मध्यान्ह भोजन योजनेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२३) * २२९१४ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चेंबूर येथील स्वामी विवेकानंद एज्युकेशन सोसायटी संचलित शाळेत सिंधी सोसायटी, कलेक्टर कॉलनी आणि ठक्कर बाप्पा कॉलनी या तीन ठिकाणी तुकड्या भरवल्या जात असून, या शाळेत इयत्ता पाचवी ते आठवीच्या मध्यान्ह भोजनासाठी पात्र विद्यार्थ्यांमध्ये सन २०२०-२१ मध्ये १७३४ तर सन २०२१-२२ मध्ये १७८४ विद्यार्थांचा समावेश होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चेंबूर येथील 'स्वामी विवेकानंद हायस्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज सिंधी सोसायटी' या अनुदानित शाळेत मध्यान्ह भोजन या योजनेंतर्गत इयत्ता पहिली व पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी मसूर डाळ २,७४८ किलो व हरभरा २,७४८ किलो तसेच सहावी ते आठवी विद्यार्थ्यांसाठी मसूर डाळ ११,८०८ किलो व हरभरा ११,८०८ किलोग्रॅम देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे जून, २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीत धान्य खराब झाल्याने त्याची विल्हेवाट लावल्याबाबतचा नियमबाह्य पंचनामा मुख्याध्यापिकेने सादर केल्याचे सांगण्यात आले असून, सदर पंचानाम्यामध्ये नुकसान झालेल्या अन्नधान्याची विल्हेवाट लावलेल्या ठिकाणाचा तसेच वापरलेल्या वाहन, चालकाचा तपशील नसल्यामुळे पंचनामा बनावट असल्याचा ठपकाही चौकशी अहवालात ठेवण्यात आला असून मध्यान्ह भोजन योजनेमध्ये गैरव्यवहार झाल्याचे माहे मार्च, २०२४ मधील पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणाच्या चौकशीसाठी शालेय शिक्षण विभागाने नेमलेल्या चौकशी समितीच्या अहवालातून २९ हजार किलो हरभरा, मसूर डाळीत अफरातफर झाल्याचे निदर्शनास आले असून, या शाळेच्या मुख्याध्यापिकेवर कारवाई करण्याबाबतची शिफारस चौकशी समितीच्या अहवालात करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू 'मध्यान्ह भोजन' योजनेतील गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्या शाळेच्या मुख्याध्यापिकेसह इतर दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.

स्वामी विवेकानंद एज्युकेशन सोसायटी संचलित शाळेत सिंधी सोसायटी, कलेक्टर कॉलनी व ठक्कर बाप्पा कॉलनी या तिन्ही शाळेचे इ.५ वी ते ८ वीच्या वर्गातील मध्यान्ह भोजन योजनेसाठी सन २०२०-२१ मध्ये १७७० विद्यार्थी तसेच, सन २०२१-२२ मध्ये एकूण १७४२ विद्यार्थ्यांचा समावेश होता.

(२) हे खरे नाही.

सदर योजनेच्या तत्कालिन पुरवठेदारामार्फत सदर शाळास्तरावर प्रत्यक्षात ६,४०० किलो मसूरडाळ व ६,४०० किलो हरभरा इतका धान्यादी मालाचा पुरवठा करण्यात आला होता.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

चेंबूर येथील स्वामी विवेकानंद हायस्कूल अँण्ड ज्युनिअर कॉलेज सिंधी सोसायटी या शाळेत सदर योजनेबाबत झालेल्या अनियमिततेबाबत विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांच्या कार्यालयामार्फत

चार सदस्यांची चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर चौकशी समितीच्या अहवालामध्ये अनियमितता झाल्याचे अभिप्राय देण्यात आले आहेत.
(५) चौकशी समितीच्या अहवालानुसार संबंधित मुख्याध्यापक यांच्याविरुध्द गुन्हा नोंदवून कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई उत्तर विभाग यांनी दिनांक २६ एप्रिल, २०२४ रोजीच्या पत्रान्वये वरिष्ठ पोलीस निरीक्षक, चुनाभट्टी पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी येथील इदगाह साल्टर हाऊस येथील भेसळयुक्त अन्नपदार्थांमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत असल्याबाबत

**(२४) * २३७७८ श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी येथील इदगाह साल्टर हाऊस येथे दुध, तुप, खवा, मिठाईमध्ये युरीया, सॅकरीन, केमिकलची भेसळ केली जात असल्याचे माहे मार्च, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बऱ्याच ठिकाणी भेसळयुक्त अन्नपदार्थांच्या घटना वारंवार घडत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अन्न पदार्थामध्ये भेसळ करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली तसेच सदर अन्न पदार्थ भेसळ रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धर्मरावबाबा आत्राम :** (१) व (२) "एबीपी माझा" या चॅनेलवर दिनांक ०२/०१/२०२४ रोजी भिवंडी निजामपूर महानगरपालिकेच्या बंद असलेल्या कत्तलखान्यामध्ये अवैधरित्या कत्तल केलेल्या जनावरांच्या अवशेषांपासून चरबी काढून त्यापासून तूपासारखे दिसणारे किंवा तूप म्हणून तयार करून छोट्या हॉटेल मध्ये विक्री करीत असलेल्या टोळीविरुध्द भिवंडी निजामपूर महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या पथकाने धाड टाकल्याची बातमी प्रसारित झालेली होती.
(३) भिवंडी निजामपूर महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या पथकाने बंद असलेल्या कत्तलखान्यामध्ये अवैधरित्या कत्तल केलेल्या जनावरांच्या अवशेषांपासून चरबी काढून त्यापासून तूपासारखे दिसणारे किंवा तूप म्हणून तयार करून छोट्या हॉटेल मध्ये विक्री करीत असलेल्या टोळीविरुध्द धाड टाकल्याबाबत प्रसारित झालेल्या बातमीचे अनुषंगाने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी यांनी दिनांक २५/०१/२०२४ रोजीच्या पत्रान्वये अन्न व औषध प्रशासनाच्या ठाणे कार्यालयास असे कळविले आहे की, महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेत काही इसमांनी अतिक्रमण करून अनधिकृतपणे/विनापरवाना मोठ्या जनावरांचे शिल्लक अवशेष (हाडे, चरबी) इत्यादी मोठ्या लोखंडी कढईमध्ये टाकून ते वितळविण्याचे काम करून त्यापासून पांढऱ्या रंगासारखा पदार्थ तयार करण्याचे काम चालू केले होते. सदर ठिकाणी आढळून आलेला मुद्देमाल उदा. लोखंडी कढई, पांढऱ्या रंगासारखे दिसणारे

तुपासारखे असलेले पदार्थाचे पत्र्याचे डब्बे, स्टीलचे मग व लोखंडी झारे इत्यादी साहित्य जप्त करण्यात आले आहे. तसेच, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यालयाने भोईवाडा पोलीस स्टेशन, भिवंडी येथे संबंधित इसमांविरुध्द गुन्हा क्र. ०२/२०२४, दिनांक ०६/०१/२०२४ रोजी दाखल करण्यात आला आहे.

सदर ठिकाणी पोलीस प्रशासनाने घेतलेले अन्न पदार्थांचे नमुने अन्न व औषध प्रशासनाच्या ठाणे कार्यालयास पाठविण्यात आले आहेत. सदर नमुने अन्न विश्लेषक, महानगरपालिका प्रयोगशाळा, जी/इत्तर प्रभाग कार्यालय, दादर (प.) येथे विश्लेषणासाठी पाठविण्यात आले असून विश्लेषण अहवाल अद्याप प्रतिक्षाधीन आहेत.

अन्न व औषध प्रशासनाच्या ठाणे कार्यालयाने माहे एप्रिल, २०२३ ते मे, २०२४ या कालावधीत भिवंडी शहर व ग्रामीण कार्यक्षेत्रामध्ये दूध तसेच दुग्धजन्य अन्न पदार्थ जसे की, तूप, कुल्फी/आईसस्क्रीम, पनीर, दही व मिल्क बेस स्वीट या अन्न पदार्थांचे एकूण ६४ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले असून विश्लेषण अहवालाच्या अनुषंगाने नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहमदनगर येथील मॅकडोनाल्डच्या उपहारगृहात चीजसदृश्य पदार्थ वापरुन ग्राहकांची फसवणूक करण्यात आल्याबाबत

**(२५) * २२९२० श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर येथील "मॅकडोनाल्ड" या आंतरराष्ट्रीय ब्रँड असलेल्या कंपनीच्या दुकानामध्ये (आऊटलेट) चीजऐवजी चीजसदृश्य पदार्थ वापरुन ग्राहकांची फसवणूक करण्यात येत असल्याची बाब माहे मार्च, २०२४ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्राहकांना गुणवत्तापूर्ण आणि कोणतीही फसवणूक न होता अन्नपदार्थ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने अन्न पदार्थ तपासणी करण्याची जबाबदारी अन्न व औषध प्रशासनाची आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या मॅकडोनाल्ड कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे. तसेच आंतरराष्ट्रीय कंपन्यांकडून ग्राहकांची अशा प्रकारच्या फसवणूक करण्याच्या प्रकारांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना हाती घेतल्या आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धर्मरावबाबा आत्राम :** (१) व (२) अन्न व औषध प्रशासनाच्या अहमदनगर कार्यालयाने M/s. Hardcastle Restaurants Private Limited (McDonalds), केडगाव, ता.जि.अहमदनगर या पेढीची तपासणी दिनांक ०७/१०/२०२३ रोजी केली. तपासणीवेळी काही अन्नपदार्थाच्या नावामध्ये Cheese, Cheesy, Cheez असा उल्लेख आढळतो. परंतु, Pure Cheese न वापरता प्रत्यक्षात Cheese Analogue (Hydrogenated Vegetable Oil + Cheese/Milk Solid Mixture) चा वापर होत असल्याचे आढळले. त्यामुळे ग्राहकांमध्ये भ्रम निर्माण होवून त्यांची दिशाभुल होत असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले.

ग्राहकांना गुणवत्तापूर्ण अन्नपदार्थ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने अन्नपदार्थाची तपासणी करण्याची जबाबदारी अन्न व औषध प्रशासनाची आहे.

(३) पदनिर्देशित अधिकारी तथा सहायक आयुक्त (अन्न), अहमदनगर यांनी M/s. Hardcastle Restaurants Private Limited (McDonalds), केडगाव, ता.जि.अहमदनगर या आस्थापनेचा मंजूर परवाना दिनांक ०६/११/२०२३ पासून निलंबित केला. सदर आदेशाविरुध्द आस्थापनेने अन्न सुरक्षा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांचेकडे दिनांक ०७/११/२०२३ रोजी अपील दाखल केले होते. अन्न सुरक्षा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांनी दिनांक ११/१२/२०२३ रोजीच्या आदेशान्वये उक्त दिनांक ०६/११/२०२३ रोजीचे परवाना निलंबनाचे आदेश कायम ठेऊन अपीलकर्ता यांचे अपील फेटाळले व सदर आस्थापनेस तपासणी अहवालातील त्रुटींची पुर्तता करणेबाबत आदेशित केले.

त्यानुषंगाने सदर आस्थापनेने आक्षेप घेण्यात आलेल्या अन्न पदार्थांच्या नावांमध्ये बदल करून अन्न व औषध प्रशासनास कळविले होते. त्यानुसार सदर आस्थापनेचा निलंबित केलेला परवाना रद्द करण्यात आला आहे. तसेच, सदर आस्थापनेविरुध्द दंडात्मक कार्यवाहीसाठी न्यायनिर्णय प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे.

अन्न व औषध प्रशासनामार्फत राज्यातील आंतरराष्ट्रीय फास्टफूड कंपन्यांच्या आऊटलेटच्या तपासण्या करण्यासाठी वेळोवेळी मोहीमा राबविल्या जातात. दिनांक ०१/१०/२०२३ ते दिनांक २९/०२/२०२४ या कालावधीत राज्यातील ३६० आऊटलेटसची तपासणी करण्यात आली. त्यापैकी एकूण २९५ आस्थापनांमध्ये त्रुटी आढळल्याने त्यांना सुधारणा नोटीस बजाविण्यात आली आहे. त्यापैकी १२ अन्न आस्थापनांनी त्रुटींची पूर्तता न केल्याने त्यांचे अन्न परवाने निलंबित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागातील शिक्षकांच्या समायोजन व बदली प्रक्रियेत विलंब झाल्याबाबत

**(२६) * २३७०२ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागातील तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी पटसंख्येच्या आधारावर पदनिश्चिती करून संचमान्यता न केल्याने अतिरिक्त शिक्षकांना वर्षभर प्रतिक्षा करावी लागत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकांची मागणी असताना व अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाबाबत शासनाचे आदेश असताना तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी अतिरिक्त शिक्षकांबाबत कोणताही निर्णय घेतला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने चंद्रपूर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागातील तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी पटसंख्येच्या आधारावर पदनिश्चिती करुन संचमान्यता न केल्यामुळे शिक्षकांच्या समायोजन व बदली प्रक्रियेत झालेल्या विलंबाबाबत

संबंधितांवर कोणती कारवाई केली तसेच शिक्षकांच्या समायोजन व बदली प्रक्रिया लवकरात लवकर कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

तथापि, ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०७/०४/२०२१ नुसार शिक्षकांच्या बदली करीता सुधारीत बदली धोरण ठरविण्यात आले आहे. त्याअनुषंगाने ऑनलाईन संगणकीय बदली पोर्टल विकसित केले असून सदर पोर्टलद्वारे जिल्हा परिषदेच्या शिक्षकांच्या संवर्गनिहास बदल्या करण्यात येतात. तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समायोजनासंदर्भात शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक १५/०३/२०२४ च्या शासन निर्णयान्वये सुधारित कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयानुसार समायोजनाची कार्यवाही करण्यात येते.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील महामार्गांना सर्व्हिस रोड तयार करणेबाबत

**(२७) * २३८०६ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सर्वात लांब महामार्गासाठी शासनाने राष्ट्रीय महामार्ग रिअल इस्टेट कायद्यांतर्गत ८ हजार हेक्टर जमीन संपादित करण्याचे काम सुरु होत असून, समृध्दी महामर्गाच्या धर्तीवर शक्तीपीठ बांधण्याची घोषणा मा.उपमुख्यमंत्री यांनी केली असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यामधून बहुतांश महामार्ग तयार होत असून, सध्या सुरत - चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्ग तसेच नागपूर - गोवा शक्तीपीठ महामार्गाचे काम सुरू होत असून सदर महामार्गामुळे नागपूरहून गोव्याला जाण्यासाठी रस्त्याने १८ तास लागत असून या माहामार्गामुळे सदर प्रवास ८ तासांत होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर महामार्गाचे आराखडे तयार करताना सर्व्हिस रोडची तरतुद केलेली असून, नवीन महामार्ग हे जमिनीपासून उंचावर येत असल्याने बाधित गावांचे शिवार दोन भागात विभागले जात आहेत, तसेच रस्त्यांना सर्व्हिस रस्ता किंवा भुयारी मार्ग (अंडर बायपास रस्ते) नसल्याने वयोवृध्द नागरिक, विद्यार्थी व शेतकरी यांच्यासह जनतेची प्रचंड गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक महामार्गाला सर्व्हिस रोड व अंडर बायपास रस्ते तयार करण्यासाठी तसेच जिल्हा रस्ता सुरक्षा समितीला अशा ठिकाणांचा सर्व्हे करून अहवाल देण्यासाठी संबंधितांना आदेशित करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे अंशतःखरे आहे.

महाराष्ट्र राज्यातील पवनार जि.वर्धा ते पात्रादेवी जि.सिंधुदुर्ग या महाराष्ट्र गोवा सरहद्द शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाची (महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग) घोषणा मा.उप मुख्यमंत्री (गृह), यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन मार्च, २०२३ मध्ये केली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गामुळे नागपूर ते गोवा राज्य प्रवास ८ ते १० तासात होणे शक्य होणार आहे.

(३) अंशत: खरे आहे.

प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल IRC च्या SP ९९-२०१३/SP ९९-२०२३. मानकांप्रमाणे तयार करणे प्रगतीपथावर आहे. ग्रामस्थ, वाहने, वन्य प्राणी यांना महामार्ग ओलांडण्याकरीता गैरसोय होऊ नये यासाठी VUP, PUP, LVUP इ. व शेतकऱ्यांकरीता Cart Tack आवश्यकतेनुसार मानकाचे तरतुदीनुसार प्रस्तावित करण्यात येत आहेत.

(४) प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल IRC च्या SP ९९-२०१३/SP ९९-२०२३. मानकांप्रमाणे तयार करणे प्रगतीपथावर आहे. ग्रामस्थ, वाहने, वन्य प्राणी यांना महामार्ग ओलांडण्याकरीता गैरसोय होऊ नये यासाठी VUP, PUP, LVUP इ. व शेतकऱ्यांकरीता Cart Tack आवश्यकतेनुसार मानकाचे तरतुदीनुसार प्रस्तावित करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील खाजगी विनाअनुदानित शाळांमधील आरटीईच्या २५ टक्के प्रवेशाची अट रद्द केल्याबाबत

**(२८) * २२९३८ श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अरुण लाड, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या शालेय शिक्षण विभागामार्फत दरवर्षी आरटीई कायद्यांतर्गत शैक्षणिक वर्षासाठी आर्थिकदृष्टया दुर्बल, वंचित, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागास घटकातील विद्यार्थ्यांना २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश दिला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आरटीई कायद्यांतर्गत दिनांक ९ फेब्रुवारी, २०२४ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेनुसार, १ किलोमीटर परिसरातील शासकीय किंवा अनुदानित शाळा असल्यास आरटीईच्या २५ टक्के प्रवेशाची अट रद्द करण्याचा निर्णय शासनाने दिनांक २० मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास घेतला असून सदर अधिसूचनेव्दारे आरटीई कायद्यांतर्गत शाळेत प्रवेश घेण्याच्या विद्यार्थ्यांच्या स्वातंत्र्यावर बंधने घालण्यात आली आहेत, शासनाच्या या निर्णयामुळे आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना विनाअनुदानित शाळांमध्ये मोफत प्रवेश मिळणे कठीण झाले असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुर्वीच्या नियमानुसार आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना त्यांच्या घरापासून ३ कि.मी अंतरावरील किंवा त्या परिघातील खाजगी शाळेत २५ % आरटीई राखीव जागांतर्गत प्रवेश घेता येत होता, परंतु शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्याचा तसेच खाजगी शाळेत विशेषत: इंग्रजी शाळांमध्ये प्रवेशाचा मार्ग बंद झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आरटीई कायदयात शासनाने केलेल्या बदलास विद्यार्थी व पालकांनी प्रचंड विरोध केलेला असून गरीब, वंचित, अपंग, अनाथ, दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या न्याय हक्कासाठी आरटीई कायद्यात केलेला बदल रद्द करून सन २००९ मध्ये संसदेत पारित झालेल्या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी ठाणे येथे विविध संघटनांनी लक्षवेधी आंदोलन करून मा.मुख्यमंत्री व शिक्षण मंत्री महोदयांना जिल्हाधिकारी यांच्यामार्फत शासनास निवेदन दिले असल्याचे माहे मार्च, २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनास दिलेल्या निवेदनानुसार घेतलेल्या निर्णयाबाबत पुनर्विचार करुन सदर निर्णय रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) दिनांक ०९/०२/२०२४ रोजीच्या अधिसूचनेविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र.१४८८७/२०२४ व संलग्न इतर रिट याचिकांमध्ये दिनांक ०६/०५/२०२४ रोजीच्याआदेशान्वये सदर अधिसूचनेस स्थगिती दिलेली आहे. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आता यापूर्वीच्या नियमानुसार आरटीई २५ टक्के प्रक्रिया राबविण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यात शासन नियमांना डावलून राज्य महामार्गालगत पेट्रोल पंप उभारणी केली असल्याबाबत

**(२९) * २३१९३ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन यांनी नंदुरबार जिल्हाधिकारी कार्यालय येथे दिनांक ०५ मार्च, २००४ रोजी पेट्रोल पंप उभारण्यासाठी 'ना-हरकत दाखला' प्राप्त होणेकरीता केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने मा.जिल्हाधिकारी यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या प्राप्त नियम व अटीच्या अधिन राहून दिनांक १८ मार्च, २००४ रोजी परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहु शहरातून जाणाऱ्या प्रस्तावित राज्य महामार्ग रस्त्याच्या मध्यापासून ५० मीटर अथवा शहराच्या बाहेरून जाणाऱ्या राज्य महामार्ग रस्त्याच्या मध्यापासून ७५ मीटर अंतरावर कोणत्याही प्रकारचे तात्पुरते अथवा कायमस्वरूपी बांधकाम करण्यास प्रतिबंध असून सद्य:स्थितीत असलेले बांधकाम हे उक्त नमूद नियमानुसार नसून परवानगी मध्ये जे अंतर प्रतिबंधित करण्यात आले आहे तेवढ्याच जागेत पेट्रोल पंप उभारला गेला असल्याची तक्रार मा.जिल्हाधिकारी यांचे कार्यालयास प्राप्त झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने अप्पर जिल्हाधिकारी नंदुरबार यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद नंदुरबार यांचेकडून अहवाल मागविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शहरातून जाणाऱ्या प्रस्तावित राज्य महामार्ग रस्त्याच्या मध्यापासून ५० मीटर अथवा शहराच्या बाहेरून जाणाऱ्या राज्य महामार्ग रस्त्याच्या मध्यापासून ७५ मीटर अंतरावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करण्यास प्रतिबंध असतानांही पेट्रोल पंपाचे बांधकाम करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नजिकच्या कालावधीत संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयास याविषयी तक्रार प्राप्त नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात शिक्षकांच्या ६७,००० जागा रिक्त असल्याबाबत

**(३०) * २३८२२ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २१३७५ ला दिनांक ७ डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ३०,००० शिक्षकांची भरती माहे जून, २०२३ पर्यंत करण्याची घोषणा मा.शालेय शिक्षणमंत्री महोदयांनी केली असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इयत्ता पहिली ते दहावी या वर्गांकरीता व कनिष्ठ महाविद्यालयातील बारावीपर्यंतच्या वर्गांकरीता असणाऱ्या शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षकांच्या ६७,००० जागा रिक्त असल्याचे त्याच दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी, २०२२ मधील प्राप्त गुणांकनास अनुसरुन एकूण २१,६७८ शिक्षकीय पदांसाठी पवित्र पोर्टलवर जाहीराती आल्या आहेत. यापैकी मुलाखतीशिवाय या प्रकारात ११,०८५ उमेदवारांची शिफारस करण्यात आलेली असून, समांतर आरक्षणामधील रिक्त राहीलेल्या जागा व उर्वरित मुलाखतीसह या प्रकारातील शिक्षकीय पदांची पवित्र प्रणालीमार्फत भरती करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

# पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील देवबांध व जव्हार तालुक्यातील वाघ नदीवर पूल बांधण्याबाबत

**(३१) * २२९९८ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील देवबांध नदीवर पूल नसल्याने भुरीटेक, कुर्लोद येथील आदिवासी नागरिकांना तसेच जव्हार तालुक्यातील वाघ नदीवर पूल नसल्याने सावरपाडा येथील नागरिकांना जीव धोक्यात घालून लाकडी तराफाच्या मदतीने नदी पार करावी लागत असल्याचे दिनांक १ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळ्यात नदीला येणाऱ्या पुरामुळे या ठिकाणच्या स्थानिक नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी पाहणी करून मोखाडा तालुक्यातील देवबांध व जव्हार तालुक्यातील वाघ नदीवर पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) मोखाडा तालुक्यातील देवबांध नदीवर शासनाने दोन पुलांना मंजूरी दिलेली असून पुलाचे काम पूर्ण झालेले आहे. सदरील पूलावरुन वाहतूक सुरु करण्यात आलेली आहे.

जव्हार तालुक्यातील वाघ नदीवरील पूल व जोडरस्त्यांसाठी लागणारी लांबी ही वनविभागाच्या अखत्यारीत असून सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारचे वर्गीकृत जोडरस्ते उपलब्ध नाहीत.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.